ORIGINAL ARTICLE ISSN:- 2231-5063

Golden Research Thoughts

*सारांश* :-

भाषा ही मानवी जीवनव्यवहाराची मुख्य वाहक आहे.भाषेमुळे मनातील विचार व्यक्त करता येतात, भाषेच्या आधारेच मानवी जीवनाच्या सर्व अंगोपागांना अर्थपुर्णता येते. म्हणुन समाजात वेगवेगळया व्यक्ती व व्यक्ती समूह सतत आपापल्या संस्कृतीचे आविष्कार घडवित असतात ते आपापल्या भाषा माध्यमातूनच, म्हणजेच भाषा हा व्यक्ती व्यक्ती मधला आणि व्यक्ती व समाज यांच्यातला दूवा आहे.

# भाषा आणि संस्कृती







*देवेंद्र बाबुराव निकम*

दादासाहेब रावल, महाविद्यालय,दोंडाईचा , जिल्हा– धुळे.

*प्रस्तावना* **:-**

दुस–यांला समजून घेण, आपले विचार, मन, इच्छा, दूस–यांला कळविणे, दुस–यांशी सहकार्य करुन जगण्यातल्या अडचणी, प्रश्न सोडवणे इथ पर्यंत जर बौध्दिक विकास झाला नसता,संघटित होऊन सुखाने जगता येणे हा शोघ जर मानवाला लागला नसता, तर समाज आणि भाषा यांचा जन्मच झाला नसता"[1] म्हणुन भाषा आणि संस्कृतीचा संबंध अविभाज्य असा आहे भाषा ही संस्कृतीची वाहक असते. अनेक पिढयाच्या ज्ञानाचा आणि अनुभवाचा त्यात संचय असतो आणि म्हणूनच भाषेची खरी गरज असते ती सांस्कृतिक समृध्दीसाठी विशिष्ठ लोकसमूहाला स्वतः ची अशी ओळख देण्याचे महत्त्वाचे काम भाषा करीत असते व ही समूह ओळखच समाजाचे समाजीकरण करते, संस्कृतीचा पाया रचते. भाषेवर कुठलाही प्रभाव पडला तर तो तिच्या संस्कृतीलाही प्रभावित करीत असतो. कोणत्याही देशाच्या संस्कृतीचा आशय मुख्यतः तेथील समाजाचे आचारविचार, राहणीमान, रीतिरिवाज, आणि जीवनप्रणालीवर अवलंबून असतो. जीवनातल्या व्यवस्थित, सर्वांना आदरणीय आणि आवश्यक अशा सवयींचा आविष्कार करणारी जी प्रणाली असते. म्हणजेच एखादया जाती अथवा समाजाचे सम्यक संस्कार असतात. तिलाच संस्कृती असे म्हटले जाते. "भाषा हे समाजाच्या जीवन विकासातील एक आधारभूत आणि सनातन असे तत्व आहे. भाषा जेव्हा नष्ट होते तेव्हा समाजाचे अस्तित्वच समाप्त होते."[2] असे कुसूमाग्रंजानी मानवी जीवनातील भाषेचे महत्व विषद करतांना सांगीतले होते. मानवाचे संपूर्ण चिंतन–मनन विचार भाषेच्या माध्यमानेच होत असते. भाषे शिवाय आपण काहीच करु शकत नाही कारण आपली संपूर्ण चिंतन प्रक्रिया ही भाषेव्दारेच संचलित होत असते. चिंतनाच्या परिणाम स्वरुप संस्कृती असते. आणि चिंतन हे भाषेविना शक्य नसते.

भाषा ही कुठल्याही संस्कृतीचा प्राण असतो. भाषा अडचणीत आली तर त्या संस्कृती पुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते, संस्कृतीला गळती सुरु होते त्या भाषा धोक्यात येतात असा इतिहास आहे. याला सांस्कृतिक संकट म्हणायला हरकत नाही.

युरोप मध्ये औद्योगिक क्रांती झाल्यानंतर युरोपीय देशातील जगातल्या अन्य देशांमध्ये बाजारपेठा शोधायला सुरुवात केली होती. भारतात फक्त इंग्रजच आले नाहीत तर पोर्तुगीज, फ्रेंच व डच लोकही आले परंतु तलवारीच्या बळावर सत्तास्थापन करण्यात इंग्रजांनी यश मिळविले तसेच जगातले आशिया, आफ्रिका, उत्तर आणि दक्षिण अमेरिका, न्युझीलंड, ऑस्ट्रेलिया या महाव्दिपामध्ये या देशानी आपले नवे वास्तव्य स्थापित करण्यात यश मिळविले ते जेथे जेथे गेले तेथे तेथे त्यांनी आपल्या भाषेबरोबर आपली संस्कृतीही नेली. जगातील बहुतांश देशांमध्ये आपले राज्य स्थापित करुन त्या देशांना गुलाम केले. आपल्या भोषेचा प्रचार आणि प्रसार करुन युरोपीय भाषांना शिक्षणाने आणि प्रशासनाचे माध्यम बनविले.ज्यामुळे सामाजिक मूल्य बददललीत, जीवनाच्या सवयी व बदलल्यात आणि बदल झपाटयाने घडुन आला.

" भाषेमध्ये अखंडपणे चालणा–या बदलाच्या प्रक्रियेत भाषा स्वाभाविकपणे वेगवेगळी रुपे धारण करते या बदलांची मुख्यतः दोन परिमाणे असतात. एक प्रादेशिक किंवा भौगोलिक आणि दुसरे कालिक किंवा ऐतिहासिक. या शिवाय विशिष्ठ समाजाच्या वर्गाच्या किंवा जातीच्या भाषेचीही विविध रुपे असतात.[3] व्यक्तीच्या भाषेवरुन त्यांची संस्कारशील वृत्ती आजमावता येते व्यक्ती समुहाच्या भाषिक वाटचालीतून त्या त्या समाजाची प्रगत अवस्था शोधता येते. विशिष्ठ समाज जी भाषा बोलतो ती त्या समाजाच्या सामाजिक – संस्कृतिक, धार्मिक जीवनाशी संबधीत असते. कोणतीही भाषा ही संवादाचे माध्यम असते. हे खरे आहे परंतु तिच्यामध्ये असलेली ताकद ही संस्कृतीच्या वटवृक्ष जपणारी असते कोणत्याही भाषेचा मृत्यु होणे म्हणजे संस्कृती नष्ट होणे. सन 1991 च्या भारताची जनगणना भाषा खंडाच्या प्रस्तावनेत लिहिले आहे की,–" भाषा आत्मा का वह रक्त है, जिसमें विचार प्रवाहित होते और पनपते है" पुढे लिहिले आहे की," यदि एक भाषा मरती है, तो एक जातीका हजारो वर्षे का अनुभव, इतिहास उसकी सांस्कृतिक विविधता तथा पहचान सदा सदाके लिये समाप्त हो जाती है"[4] भाषा या एका रात्रीत मरत नाहीत शेवटच्या भाषक मरे पर्यंत अनेक दशके किंवा शतके जातात. खरे तर त्या नैसर्गिक रित्या मरत नाहीत. निजभाषकाकडून त्यांची हत्या होते. त्यांचा वापर थांबवून व अन्य प्रबळ भाषेचा स्विकार करुन. " बडोदा येथील भाषा संशोधन आणि प्रकाशन केंद्रातर्फे भारतीय भांषाच्या नुकत्याच केलेल्या एका सर्वेक्षणातुन भारतात सध्या विविध स्थानिक बोलींसह 780 भाषा बोलल्या जात आहेत आणि 60 लिपी अस्तित्वात आहेत. परंतु गेल्या शंभर वर्षात देशातील हजारो भाषा काळाच्या उदरात लोप पावल्याने आता आस्तित्वाच्या काठावरील भाषा जपण्याची आवश्यकता आहे. या मध्ये आदिवासी, भटके–विमुक्त तसेच अन्य समुहाचा भाषा धोक्यात आल्या असून त्याचे जतन सवर्धन होणे गरजेचे आहे. भाषा हा कुठल्याही संस्कृतीचा प्राण असतो. भाषा अडचणीत आली तर त्या संस्कृतीपुढे मोठे प्रश्नचिन्ह उभे राहते. प्रत्येक भाषा एक वेगळं जग तयार करते वेगळी संस्कृती तयार करते. भाषेचा नाश होण्यामुळे केवळ तिची मौखिकता नष्ट होणार नाही तर जैव सांस्कृतीक ज्ञान नष्ट होणार आहे. '[5]

'दैनिक लोकसत्ता'[6] या वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत डॉ.गणेश देवी यांनी सांगीतले की, हिमाचल प्रदेशच्या भाषामध्ये बर्फासाठी 220 पेक्षा जास्त शब्द आहेत. गढुळ पाण्यावर पडणारा बर्फ, बर्फ पडतांना प्रकाश असेल तर, बर्फ पडल्या नंतर वादळ येणार असेल तर, अशा विविध प्रकारासाठी शब्द आहेत. जेव्हा हिमालयाचे ग्लेशिअर्स वितळायला लागतील तेव्हा असे शब्द असतील तर, त्या ग्लेशिअर्सच वितळणं जास्त लवकर कळेल, नाही तर इस्त्रायल किंवा जपान तज्ज्ञ मागवून आपल्याला ती आपत्ती त्यांच्या कडुन समजून घ्यावी लागेल. त्सुनामी आली त्यावेळी अंदमानचे सगळे

आदिवासी जगले, एकही आदिवासी मेला नाही. कारण त्याच्याकडे बदलणा–या लाटाचे अंग समजणारे शब्द होते. या वरुन आपण आपली भाषा, लिपी,संस्कृती, जतन करुन ठेवली पाहिजे. फादर दिब्रिटो यांनी श्शओॲसिसच्या शोधात''[7] या प्रवास वर्णनात फ्रेंच भाषेबददल आपले अनुभव सांगितले आहे व फ्रेंच माणसाला आपल्या भाषेबददल आत्यंतिक प्रेम, फ्रेंच जनता आपल्या भाषेबददल खुप जागरुक आहेत, आपली मातृभाषा ही त्याला प्राणसखीच वाटते ''हिचे पुत्र आम्ही, हिचे पांग फेडूश्श असे तो केवळ कवितेत म्हणत नाही तर तिच्या संवंधनासाठी आणि प्रसारासाठी मिशनरी वृत्तीने झटतो. एखादा नवीन शब्द शब्दकोशात समाविष्ठ करुन घ्यायला असेल तर त्यासाठी सर्वोच्च फ्रेंच अकादमी ची मान्यता मिळवावी लागते. सर्व प्रकारच्या अग्निपरिक्षेतून पार पडल्यानंतरच त्या शब्दाकोशात मानाचं स्थान मिळत.

हॅबर्गर, कोक, चिप्स, असे शब्द फ्रान्स मधील दुकानाच्या पाटयावर झळकु लागताच हे इंग्रजीच आक्रमण आहे असा आक्रोश सुरु झाला. ताबडतोब फ्रेंच आदेश जारी केला की एकही इंग्रजी शब्द सार्वजनिक ठिकाणी दिसता कामा नये, लोकांनी उत्स्फुर्तपणे त्या आदेशाचा स्वागत केले समाजाचा विकासाच्या, प्रगतीच्या दृष्टीने भाषेला फार महत्व आहे आज मराठी भाषेचे होणारे स्वरुप दिब्रिटोनी सुचित केल्याचे दिसते.

भारतीय राज्य घटनेने प्रत्येक भारतीय नागरीकास आपली वैशिष्टपुर्ण भाषा, लिपी, संस्कृती जतन करण्याचा अधिकार दिलेला आहे. भाषा ही मोठी संपत्ती आहे, मोठे साधन आहे. कोणत्याही विभागाच्या अथवा समाजाचा विकास होण्यासाठी त्याच्या स्वाभाविक व नैसर्गिक संपत्तीचा जास्तीत जास्त उपयोग करुन घ्यावा लागतो हे तत्व अर्थशास्त्रात सर्वमान्य आहे त्यावरुनच लोकभाषा या मोठया संपत्तीचा व साधनाचा विकास करुन घेणे आवश्यक आहे. आजही खेडे गावात सर्व व्यवहार आपल्या मायबोलीतून चालतात. आपली जमीन आपली भाषा व संस्कृती, नव्या परिस्थिती जुळवत पण स्वत्व राखत ते प्रयत्न करीत असतात. ब्रिटीश राजवटीसाठी स्वभाषा टिकली पण आता स्वकीय राज्यकर्तेच त्यावर वज्राघात करीत आहेत. शेती आणि खेडे गावातून आपण उचलले जाऊ या भितीने आणि नोकरी मिळविण्याच्या आशेने आज खेडेगावात सुध्दा इंग्रजी माध्यमाचे वेड वाढत चालले आहे. भाषा स्वतःहुन काहीच करत नाही. भाषेचे बरेवाईट शेवटी माणसेच करीत असतात आणि त्यामागे सामाजिक राजकिय व मुख्य म्हणजे आर्थिक प्रेरणा असतात.

आज सर्वच क्षेत्रात इंग्रजीचे महत्व वाढलेले दिसुन येते. इंग्रजी ही रोजगाराशी जोडल्या गेलेली भाषा आहे. देशीय भाषा उपेक्षित होत आहे. विदेशी भाषांच्या वर्चस्वामुळे सांस्कृतिक संकट निर्माण झाले आहे. ''समृध्द परंपरा असलेल्या भारतीय भाषातील साहित्य निर्मिती व नाटयचित्रपटांची कलानिर्मितीचे वैभव संपूष्ठात येऊन त्यांना उतरती कळा लागलेली आहे. कारण मातृभाषेतुन शिक्षण न झाल्यामुळे नवीन पिढयांची भाषिक क्षमता कमी होईल. इंग्रजी हीच त्यांची मातृभाषा होईल. दोन पिढयातील भाषिक सांस्कृतिक देवाणघेवाण संपेल''[8] या मुळे भाषिक वर्गभेद वाढतील परिणामस्वरुप समाजात सांस्कृतिक व्दंद आणि संघर्षांची स्थिती निर्माण झाल्याशिवाय राहणार नाही.

भाषा आणि संस्कृती यांच्या अटूट संबधविषयी एक श्शमाओरीश्श9 आदिवासी म्हणतो.

As long as we have the language  
We have the culture  
As long as we have the culture  
We can hold on to the land

## *गोषवारा –*

थोडक्यात भाषेला एक संस्कृती असते, भाषा ही समाज व्यवहाराचे साधन असून त्या व्यवहाराचा अंगभुत भाग असल्यामुळे त्या त्या भाषिक समाजाच्या, परंपरेचा व संस्कृतीचा ठसा तिच्यावर सतत उमटत असतो. भाषा ही मानवी प्रगतीचे सर्वश्रेष्ठ साधन आहे. स्वभाषा म्हणजे संस्कृतीशी जोडणारी नाळच असते. मातृभाषेपासून दूर जाणे म्हणजे सुसंस्कृती पासुन दूर जाणे, एखादया समाजाची संस्कृती व परंपरा यांची जोपासना व संवर्धन त्या समाजाच्या मातृभाषेतूनच होऊ शकते.

## *संदर्भ ग्रंथ –*

1.भाषा आणि संस्कृती– ना.गो.कालेलकर मौजे प्रकाशन, मुंबई–ति.आ.मार्च 1999 प्रस्तावना पृ.7
2.दैनिक पुण्यनगरी दि.27 / 02 / 2013
3.भारतीय भाषांचे लोक सर्वेक्षण (महाराष्ट्र) संपा.अरुण जाखडे, प्रकाशक– पद्मगंधा प्रकाशन पुणे प्र.आ.2013 पृ.11
4.साहित्य अमृत (मासिक) संपा.त्रिलोकीनाथ चतुर्वेदी सिंतबर–2012 पृ.23
5.भारतीय भाषांची समृध्द अडगळ, डॉ.प्रकाश परब यांचा लेख दै.लोकसत्ता दि.2 नोव्हे 2013
6.डॉ. गणेश देवी यांची मुलाखत दै.लोकसत्ता दि. 22 सप्टेबर 2013
7.'' ओॲसिसच्या शोधात'– प्रवास वर्णन, फादर फ्रन्सिस दिब्रिटो
8.डॉ. प्रकाश परब यांचा लेख
9.साहित्य अमृत (मासिक) संपा. त्रिलोकीनाथ चतुर्वेदी सिंतबर–2012 पृ.23